सकाळ

पिंपरी-चिंचवड TODAY पुणे, सोमवार, २३ डिसेंबर २०२४



कॉलेज कट्टा

# करियर ऑपर्च्युनिटिज इन फार्मसी

■ श्रृती गांधी (रसिकलाल एम. धारीवाल कॉलेज ऑफ फार्मसी)

श्री जैन विद्या प्रसारक मंडळ संचालित चिंचवड येथील रसिकलाल एम. धारीवाल कॉलेज ऑफ फार्मसी येथे प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी इंडक्शन प्रोग्राम आयोजित केला होता. अमोल हिंगणे (संचालक, गॅल्निोवेक्स मोल्यूशन एलएलपी) व स्वाती हिंगणे (मानसशास्त्र तज्ज्ञ) प्रमुख पाहुणे होते. के. बी. खिलारी (विस्तार अधिकारी, श्री जैन विद्या प्रसारक मंडळ), प्राचार्य डॉ. सचिन फेगडे उपस्थित होते. धन्वंतरी पूजन आणि दीपप्रज्वलनाने कार्यक्रम सुरू झाला. प्राचार्य डॉ. फेगडे यांनी प्रास्ताविक केले. फार्मसी क्षेत्रातील वेगवेगळ्या प्रसिद्ध व्यक्तिमत्त्वांचे उदाहरणे देऊन विद्यार्थ्यांना त्यांनी प्रेरणादायी मार्गदर्शन केले. खिलारी यांनी शिक्षणाचे महत्त्व पटवून देत विद्यार्थ्यांशी संवाद साधला. अमोल हिंगणे यांनी 'करियर ऑपर्च्युनिटिज इन फार्मसी' विषयावर मार्गदर्शन केले. प्रा. स्वाती ढगे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. मंजुश्री गुंजेगावकर यांनी आभार मानले. संस्थेचे अध्यक्ष प्रकाश धारीवाल, कार्याध्यक्ष शांतीलाल लुंकड, मानद सरचिटणीस अॅड. राजेंद्रकुमार मुथा, संस्थेचे कोषाध्यक्ष प्रकाशचंद चोपडा यांचे मार्गदर्शन लाभले.

RASIKLAL M. DHARIWAL COLLEGE OF PHARMACY
D-PHARM
Chinchwad Station,
Pune-411 019.

PRINCIPAL
RASIKLAL M. DHARIWAL
COLLEGE OF PHARMACY